# न्यूज एक्सप्रेस मराठी

मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!

: ९८३४१३८४८२




# 276 एकरवरील 1, 511 अनधिकृत बांधकामे जमीनदोस्त

## पालिकेच्या इतिहासातील मोठी कारवाई : सलग तीन दिवसांत 1 हजार 511 अतिक्रमणे हटविली

**पिंपरी | प्रतिनिधी**

चिखली येथील कुदळवाडी भागात आज सलग तिसऱ्या दिवशीही अतिक्रमण कारवाई करण्यात आली. ७७ एकर क्षेत्रामध्ये झालेल्या या कारवाईदरम्यान आज एकूण ६८२ बांधकामे निष्कासित करण्यात आली. शहरातील नियोजित विकास आरक्षणे आणि नागरिकांच्या सुविधांसाठी असलेल्या जागेवरील अनधिकृत पत्राशेड, कारखाने, गोदामे, भंगार दुकाने तसेच अनधिकृत बांधकामे हटविण्यासाठी ही कारवाई करण्यात येत असून यापुढेही ती चालू राहणार आहे. दरम्यान गेल्या तीन दिवसांत १ हजार ५११ अतिक्रमणे हटविली आहेत.



पिंपरी चिंचवड महापालिकेच्या बांधकाम परवानगी व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभाग आणि क्षेत्रीय धडक कारवाई पथकांमार्फत करण्यात आलेल्या या कारवाईमध्ये सोमवारी झालेल्या कारवाईमध्ये ३३ लाख ५८ हजार १३० चौरस फूट बांधकामांवर निष्कासनाची कारवाई करण्यात आली. त्यामध्ये ६८२ बांधकामांचा समावेश होता. तीन दिवसात तब्बल 276 एकरावर असलेली अनधिकृत बांधकामे हटविण्यात आली आहे.

पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे आणि महापालिका आयुक्त शेखर सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या या कारवाईमध्ये अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, उपआयुक्त मनोज लोणकर, क्षेत्रीय अधिकारी राजेश आगळे, सुचेता पानसरे, अमित पंडित, किशोर ननवरे, उमेश ढाकणे, अजिंक्य येळे, शितल वाकडे, श्रीकांत कोळप यांच्यासह कार्यकारी अभियंता, उपअभियंता, कनिष्ठ अभियंता सहभागी झाले होते. सह पोलीस आयुक्त शशिकांत महावरकर, अतिरिक्त पोलिस आयुक्त वसंत परदेशी यांच्या अधिपत्याखाली पोलीस उपआयुक्त स्वप्ना गोरे, डॉ. शिवाजी पवार, संदीप डोईफोडे, विवेक पाटील यांच्या नेतृत्वाखाली या परिसरात चोख पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

या कारवाईमध्ये महापालिका अतिक्रमण धडक कारवाई पथकामधील ४ कार्यकारी अभियंते, १६ उपअभियंते, महाराष्ट्र सुरक्षा दलाचे १८० जवान, ६०० पोलीस आणि मजूर कर्मचारी सहभागी झाले होते. १६ पोकलेन, ८ जेसीबी, १ क्रेन आणि ४ कटर यांचा वापर निष्कासन कारवाईमध्ये करण्यात आला. शिवाय ३ अग्निशमन वाहने आणि २ रुग्णवाहिका देखील येथे तैनात करण्यात आल्या होत्या. महापालिका यंत्रणेसह पोलीस, वीज वितरण कंपनीचे अधिकारी कर्मचारी देखील सहभागी झाले होते.

### 1 हजार 511 अतिक्रमणे हटविली

» पिंपरी चिंचवड महापालिकेने ८ ते १० फेब्रुवारीपर्यंत 276 एकर क्षेत्रावर असलेली अनधिकृत बांधकामे हटविली. आजवर १ कोटी २० लाख ७२ हजार चौरस फूट अनधिकृत बांधकाम जमीनदोस्त करण्यात आले आहे.सलग तीन दिवसांत १ हजार ५११ अतिक्रमणे हटविली आहेत.

# प्रियांका इंगळे हिचा दिशा फाऊंडेशनतर्फे सत्कार

## सर्वांनी खो खो खेळाच्या प्रगतीसाठी प्रयत्न केले पाहिजे : प्रियांका इंगळेची अपेक्षा

**पिंपरी | प्रतिनिधी**

लहानपणापासून मी खो-खो खेळते आहे, याचा मला खूप अभिमान आहे. खो खो मुळेच मला स्वतंत्र ओळख मिळाली, असे सांगतानाच सर्वांनी खो खो खेळाच्या प्रगतीसाठी प्रयत्न केले पाहिजे, अशी अपेक्षा आंतरराष्ट्रीय खो खो खेळाडू कु. प्रियांका इंगळे हिने व्यक्त केली.

भारतीय महिला खो खो संघाने पहिला जागतिक करंडक (वर्ल्ड कप) जिंकून आपल्या देशाची मान उंचावली आहे. पिंपरी चिंचवडची कन्या कु. प्रियांका इंगळे हिच्या नेतृत्वाखाली भारतीय संघाने ही कामगिरी केली. यानिमित्ताने दिशा सोशल फाऊंडेशनच्या वतीने कर्तृत्ववान प्रियांकाचा खो खो खेळाचे साहित्य देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी फाऊंडेशनचे उपाध्यक्ष संतोष बाबर, कोषाध्यक्ष नंदकुमार कांबळे, संचालक बाजीराव लोखंडे, अविनाश ववले, पांडुरंग लोखंडे, संतोष गवते उपस्थित होते. प्रियांकामध्ये असलेले विशेष प्राविण्य हेरून तिच्या खेळाला गती देण्याचे काम प्रशिक्षक अविनाश करवंदे यांनी केले. त्यांचाही यावेळी यथोचित सत्कार करण्यात आला.



यावेळी बोलताना प्रियांका म्हणाली की, मला खो-खो हा खेळ लहानपणापासून आवडत होता. पाचवीत असताना शाळेच्या मैदानावरती खो-खो चा सराव मी रोज पाहत असायचे. माझ्या मनात खो-खो खेळाविषयी आवड निर्माण झाली. २००९ पासून मी खो खो खेळायला सुरुवात केली. सुरुवातीला घरच्या मंडळींचा पाठिंबा नव्हता. मुळात त्यांना खो-खो विषयीची माहितीच नव्हती. नंतर पुढे जाऊन माझी खेळाविषयी आवड व कामगिरी पाहून त्यांचे पाठबळ मिळाले. माझे मार्गदर्शक अविनाश करवंदे यांच्यामुळेच मला यश मिळू शकले. या सर्वांना माझा अभिमान वाटतो.

१४ वर्षीय गटातील सर्वोत्कृष्ट खेळाडूच्या पुरस्काराने मला गौरवण्यात आले, तो एक माझा अविस्मरणीय क्षण आहे. याशिवाय, महिला गटात राष्ट्रीय स्पर्धेत राणी लक्ष्मीबाई या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. चौथ्या आशियाई क्रीडा स्पर्धेत माझी निवड करण्यात आली. महाराष्ट्र शासनाचा शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार मला जाहीर झाला. महाराष्ट्र राज्य शासनाची गट ब राजपत्रित क्रीडा कार्यकारी अधिकारी म्हणून माझी निवड झाली, असे बरेचसे क्षण मी कधीच विसरू शकत नाही.

प्रशिक्षक करवंदे म्हणाले की, भविष्यात खो खो खेळाला सुगीचे दिवस आणायचे आहे, त्यादृष्टीने अनेक खेळाडूंचे या खेळाकडे लक्ष वेधून घ्यायचे असून त्यांना या खेळात विशेष प्राविण्य मिळवून द्यायचे आहे.

# पुण्यात 'जीबीएस'चा आणखी एक बळी

## मृत्यू झालेल्या रुग्णांची संख्या सातवर : एकूण रुग्णांच्या संख्येतही वाढ

**पुणे | प्रतिनिधी**

राज्यात गुइलेन बॅरे सिंड्रोमच्या (जीबीएस) आणखी एका रुग्णाचा मृत्यू झाला आहे. पुणे महापालिकेच्या कमला नेहरू रुग्णालयात ३७ वर्षीय रुग्णाच्या मृत्यूची नोंद झाली आहे. यामुळे राज्यात आतापर्यंत मृत्यू झालेल्या रुग्णांची संख्या सात झाली आहे. दरम्यान, राज्यातील जीबीएसची रुग्णसंख्या १९२ वर पोहोचली आहे.

कमला नेहरू रुग्णालयात ३७ वर्षीय पुरुषाचा जीबीएसने रविवारी (ता.९) रात्री मृत्यू झाला. तो बिबवेवाडीतील अप्पर इंदिरानगरमधील रहिवासी होता आणि वाहनचालक म्हणून काम करीत होता. या रुग्णाला ३१ जानेवारीपासून अशक्तपणा जाणवत होता. त्याला पुण्यातील भारती रुग्णालयात उपचारासाठी नेण्यात आले. मात्र, नातेवाईकांनी १ फेब्रुवारीला त्याला तेथून हलवून निपाणीमध्ये नेऊन उपचार सुरू केले. तेथील उपचारांमुळे रुग्णाच्या प्रकृतीत सुधारणा झाली नाही. त्यामुळे त्याला सांगलीतील भारती रुग्णालयात हलविण्यात आले. तिथे त्याची प्रकृती आणखी बिघडल्याने त्याला पुण्यातील कमला नेहरू रुग्णालयात ५ फेब्रुवारीला दाखल करण्यात आले. त्याचा उपचारादरम्यान रविवारी मृत्यू झाला, अशी माहिती आरोग्य विभागाने दिली.

राज्यात जीबीएसचे आतापर्यंत १९२ रुग्ण आढळून आले असून, त्यातील १६७ रुग्णांचे जीबीएस निदान झाले आहे. पुण्यातील जीबीएस रुग्णसंख्येतील वाढ सुरूच असून, पुणे महापालिका ३९, महापालिकेत नव्याने समाविष्ट गावे ९१, पिंपरी-चिंचवड महापालिका २९, पुणे ग्रामीण २५ अशी रुग्णसंख्या आहे. राज्यात इतर जिल्ह्यांत आतापर्यंत ८ रुग्ण आढळून आले आहेत. राज्यात आढळलेल्या एकूण रुग्णांपैकी ४८ जणांवर अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. याचबरोबर २१ रुग्ण व्हेंटिलेटरवर आहेत. राज्यभरात ९१ रुग्णांना उपचार करून घरी सोडण्यात आले आहे, असे आरोग्य विभागाने स्पष्ट केले.



**वयोगटनिहाय जीबीएस रुग्णसंख्या**

| वयोगट | रुग्ण |
| --- | --- |
| ० ते ९ | २३ |
| १० ते १९ | २२ |
| २० ते २९ | ४२ |
| ३० ते ३९ | २३ |
| ४० ते ४९ | २६ |
| ५० ते ५९ | २८ |
| ६० ते ६९ | २० |
| ७० ते ७९ | ४ |
| ८० ते ८९ | ४ |
| एकूण | १९२ |

# टाकाऊ वस्तूंपासून कलाकृती उभारत सार्वजनिक जागा केली 'कचरामुक्त'

## पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या आरोग्य विभागाच्या कर्मचाऱ्यांचा अनोखा प्रयोग

**पिंपरी | प्रतिनिधी**

मोकळ्या जागेवर टाकण्यात येणाऱ्या कचऱ्याची समस्या सोडवण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाच्या कर्मचाऱ्यांनी अनोखा उपाय केला आहे. या कर्मचाऱ्यांनी चिंचवड परिसरातील कावळे वखार मोहननगर येथील सार्वजनिक जागेवर खराब झालेले झाडू, बांबूच्या काठ्या तसेच इतर टाकाऊ वस्तूंचा अतिशय कल्पकतेने वापर करून सुंदर कलाकृती उभारली आहे. 'आर्ट टू वेस्ट' ही संकल्पना राबवल्यामुळे हा परिसर कचरामुक्त झाला आहे. शिवाय याठिकाणी आता सेल्फी काढण्याचा आनंदही नागरिक घेऊ लागले आहेत.

कल्पकतेला नाविन्यतेची जोड देऊन एखादी सार्वजनिक जागा कचरामुक्त करून अधिक सुंदर बनवण्याची कमाल महानगरपालिकेच्या आरोग्य कर्मचाऱ्यांनी करून दाखवली आहे. चिंचवड परिसरातील कावळे वखार मोहननगर येथे असणाऱ्या मोकळ्या जागेवर परिसरातील नागरिकांकडून कचरा टाकला जात होता. येथे कचरा टाकू नये, असे वारंवार आवाहन महानगरपालिकेकडून करण्यात येत होते. परंतु त्यानंतरही कचरा टाकण्याचा प्रकार सुरू असल्याने हा परिसर अस्वच्छ झाला होता. अखेर येथील समस्या कायमस्वरूपी सोडवण्यासाठी आरोग्य विभागाच्या कर्मचाऱ्यांनी अनोखा उपाय केला आहे.

आरोग्य विभागाच्या कर्मचाऱ्यांनी या ठिकाणी स्वच्छता करून खराब झाडू, बांबूच्या काठ्या, इतर टाकाऊ वस्तू यांचा कल्पकतेने वापर करून सुंदर व सुबक कलाकृती तयार केली. त्यामुळे येथील कचऱ्याची समस्या दूर तर झाली आहेच, शिवाय येथील स्थानिक नागरिक ही जागा स्वच्छ राहील, यासाठी काळजी घेऊ लागले आहेत. ही जागा कचरामुक्त करण्यासाठी आरोग्य कर्मचाऱ्यांनी केलेल्या प्रयत्नांचे परिसरातील नागरिकांकडून कौतुक होऊ लागले आहे. ही जागा कचरामुक्त करून तेथे टाकाऊ वस्तूंपासून कलाकृती तयार करून उभारण्यासाठी महापालिका 'अ' क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत क्षेत्रीय अधिकारी शीतल वाकडे, सहाय्यक आरोग्य अधिकारी राजू साबळे, मुख्य आरोग्य निरीक्षक दत्तात्रय गणगे व प्रभाग क्रमांक १४ चे आरोग्य निरीक्षक विकास शिंदे महापालिका अधिकारी, कर्मचारी आदींनी यासाठी विशेष परिश्रम घेतले.



> कचरा मुक्त पिंपरी चिंचवड शहरासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिका सातत्याने विविध उपक्रम राबवत असते. चिंचवड परिसरात आरोग्य कर्मचाऱ्यांनी राबविलेली 'आर्ट टू वेस्ट' ही संकल्पना कौतुकास्पद आहे. अशा अभिनव संकल्पना राबविण्याचा प्रयोग आरोग्य विभागाकडून सातत्याने केला जात असतो. नागरिकांनीही पिंपरी चिंचवड शहर कचरामुक्त करण्यासाठी आरोग्य विभागाकडून राबवण्यात येत असलेल्या उपक्रमांमध्ये सहभागी होणे गरजेचे आहे.
>
> **- सचिन पवार, उप आयुक्त, आरोग्य विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**

# जनसंवाद सभेत पाण्यासाठी मोर्चा

**भोसरी आणि दिघी परिसरात सतत विस्कळित होत असलेल्या पाणीपुरवठ्यामुळे नागरिकांनी जनसंवाद सभेत मोर्चा काढत अधिकाऱ्यांना जाब विचारला.**

**पिंपरी | प्रतिनिधी**

भोसरी आणि दिघी परिसरात सतत विस्कळित होत असलेल्या पाणीपुरवठ्यामुळे नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे. तर याविरोधात दिघीकरांनी पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या ई प्रभाग क्षेत्रीय कार्यालयात जनसंवाद सभेत मोर्चा काढत अधिकाऱ्यांना जाब विचारला.

महापालिकेद्वारे शहर परिसरात दिवसाआड पाणीपुरवठा केला जात आहे. त्यातही पाणीपुरवठ्यात अनियमितता असल्याने नागरिकांच्या समस्या वाढल्या आहेत. नुकताच उन्हाळा सुरू झाला असून, उन्हाळ्याच्या सुरूवातीलाच पाण्याच्या समस्येने तोंड वर काढले असल्याने हा उन्हाळा कसा जाणार असा प्रश्न नागरिकांना पडला आहे.

आळंदी रस्त्यावरील आदर्शनगर, संत तुकारामनगर, गवळीनगर, छत्रपती संभाजीनगर आदी भागातील पाणीपुरवठा गेल्या एक महिन्यापासून अनियमित वेळेत होत आहे. त्यामुळे येथील नागरिकांच्या समस्या वाढल्या आहेत. काही वेळा पाणीपुरवठाच होत नसल्याने नागरिकांना तीन-तीन दिवस पाणी जपून वापरावे लागत आहे.



### वॉल्व्हच्या दुरुस्तीकडे दुर्लक्ष

» भोसरीतील दिघी रस्त्यावर फुगे प्रायमाजवळ आणि दिघीतील धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज चौकात पाण्याच्या दिवशी वॉल्व्हमधून मोठ्या प्रमाणात पाणी वाया जात आहे. ही समस्या गेल्या काही महिन्यांपासूनची असतानाही या वॉल्व्हची अद्यापपर्यंत महापालिकेद्वारे दुरुस्ती करण्यात आलेली नाही.

> गेल्या काही दिवसांत शहर परिसरातील मुख्य जलवाहिन्यांमध्ये तीन वेळा बिघाड झाला. त्याचा परिणाम पाणीपुरवठ्यावर झाला. दिघी हे शहरातील पाणीपुरवठा विभागाचे शेवटचे टोक आहे. त्यामुळे जलवाहिन्यांत झालेल्या बिघाडाचा अधिक परिणाम दिघीवर दिसून येतो. बिघाडानंतर पाण्याला पुरेसा दाब मिळत नसल्याने भोसरी आणि दिघीतील काही भागात कमी दाबाने पाणीपुरवठा होतो. मात्र, सर्व जलवाहिन्यांची दुरुस्ती करण्यात आल्याने येत्या तीन दिवसांत दिघी आणि भोसरीतील पाणीपुरवठा सुरळीत होईल.
>
> **- विजयसिंह भोसले, कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा विभाग 'क'आणि 'ई' प्रभाग**

> भोसरीतील संत तुकारामनगरातील पाणीपुरवठा कमी दाबाने आणि कमी वेळ होत आहे. पाणीपुरवठा विस्कळित झाल्यावर नागरिकांना पाणी टँकरद्वारे विकत घ्यावे लागते. पाच हजार रुपयांचा टँकर हजार रुपयांना विकत घ्यावा लागतो. दिवसाआड पाण्याच्या नियोजनामध्ये महापालिका टँकर लॉबीला पोसत आहे.
>
> **- ॲड. सचिन गोडांबे, नागरिक, भोसरी**

दिघी परिसरासह भोसरीतीलही काही भागाचा पाणीपुरवठा पूर्णपणे विस्कळित झाल्याने सोमवारी (ता. १०) महापालिकेच्या ई प्रभाग क्षेत्रीय कार्यालयात जनसंवाद सभेत दिघीतील नागरिकांनी दिघीकर विकास प्रतिष्ठानद्वारे मोर्चा काढत अधिकाऱ्यांना जाब विचारला. या जनसंवाद सभेत पाण्याची समस्या घेऊन दिघीतील नागरिक, माजी सैनिक, महिला भगिनी आणि प्रतिष्ठानचे पदाधिकारी सहभागी झाले होते. या वेळी पाण्याची समस्येचे झालेले गंभीर स्वरूप नागरिकांनी अधिकाऱ्यांच्या लक्षात आणून दिले.

सामाजिक कार्यकर्ते रवींद्र चव्हाण, ज्ञानेश आल्हाट, माजी सैनिक आमसिद्ध भिसे, विजया मासाळ, शशिकांत वाळके, शशिकांत गायकवाड, मानवाधिकारचे संजय धुमाळ यांच्यासह प्रतिष्ठानचे अध्यक्ष ॲड. उत्तम घुगे यांनी जनसंवाद सभेत समस्या मांडल्या. प्रतिष्ठानच्या पदाधिकाऱ्यांसह ज्येष्ठ नागरिक अंकुश बागल, सुभाष घाडगे, गुलाब हुसेन शिलेदार, संजय कांबळे, विनायक गोडसे, हिंदूराव पाटील, सादिल खान, विनायक यादव, ओमप्रकाश यादव, मारुती पाटील, महादेव पालकर, मारुती आर्दळकर, सोमनाथ लहाने, प्रफुल्ल मोहिते आदींच्या स्वाक्षऱ्यांचे निवेदन पाणीपुरवठा विभागातील अधिकाऱ्यांना देण्यात आले.

या वेळी पाण्याअभावी घरातील कामे करण्यास विविध अडचणींचा सामना करावा लागत असल्याची कैफियत ज्येष्ठ महिला मंगल साळवी, ज्योत्स्ना ढाके, सुनीता घोलप, सुनीता जाधव, प्रमिला महाडीक, लीलाबाई माळी आदींनी मांडली.

# पिंपरी-चिंचवड महापालिकेसमोर झळकले बॅनर, मंत्री सरनाईकांना केली विनंती

**उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंना आपत्ती व्यवस्थापन समितीतून वगळल्याची माहिती, शिंदेंच्या लोकप्रिय ठरलेल्या योजनादेखील बंद करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे.**

**पिंपरी | प्रतिनिधी**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंना आपत्ती व्यवस्थापन समितीतून वगळल्याची माहिती समोर आली आहे. तर दुसरीकडं शिंदेंच्या लोकप्रिय ठरलेल्या योजनादेखील बंद करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंना आपत्ती व्यवस्थापन समितीतून वगळल्याची माहिती समोर आली आहे. तर दुसरीकडं शिंदेंच्या लोकप्रिय ठरलेल्या योजनादेखील बंद करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. राज्य सरकारच्या या भूमिकेमुळे शिंदेंच्या कार्यकर्त्यांमध्ये नाराजीचं सुर उमटू लागलं आहेत. आपातकालीन परिस्थितीत ही समिती मुख्यमंत्र्यांच्या





नेतृत्वाखाली संबंधित यंत्रणांशी समन्वय साधण्याचे काम करते. या समितीत अजित पवार यांच्यासह महसूल, मदत व पुनवर्सन, आपत्ती व्यवस्थापन आणि आरोग्य समितीचे मंत्र्याचा समावेश करण्यात आला आहे. विशेष करून एकनाथ शिंदे यांच्याकडे नगरविकास खातं असूनही त्यांना या समितीतून वगळ्यात आल्याने सर्वांच्या भुवया उंचावल्या आहेत. याप्रकरणी ठिकठिकाणी बॅनरबाजी करण्यात येत आहे.

मुंबईतील जुलै २००५ सालच्या पुरानंतर ही स्थापन करण्यात आलेल्या समितीचे पदसिद्ध अध्यक्ष हे राज्याचे मुख्यमंत्री असतात. त्यानुसार या समितीचे अध्यक्षपद आता देवेंद्र फडणवीस यांच्याकडे आले आहे. आपातकालीन परिस्थितीत ही समिती मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वाखाली संबंधित यंत्रणांशी समन्वय साधण्याचे काम करते. या समितीत अजित पवार यांच्यासह महसूल, मदत व पुनवर्सन, आपत्ती व्यवस्थापन आणि आरोग्य समितीचे मंत्र्याचा समावेश करण्यात आला आहे. विशेष करून एकनाथ शिंदे यांच्याकडे नगरविकास खातं असूनही त्यांना या समितीतून वगळ्यात आल्याने सर्वांच्या भुवया उंचावल्या आहेत.

दरम्यान, मुख्यमंत्री असतांना एकनाथ शिंदे यांनी सुरू केलेल्या 'आनंदाचा शिधा', तसेच 'तीर्थ दर्शन' योजनांना देखील नव्या सरकारने ब्रेक लावला आहे. त्याचबरोबर नव्या सरकारमधील मंत्र्यांचे स्वीय सहाय्यक आणि विशेष कार्यकारी अधिकारी नेमण्याच्या मुद्द्यावरूनही शिवसेना शिंदे गटाचे मंत्री प्रचंड नाराज असल्याची माहितीदेखील समोर आली आहे.

# खेड तालुक्यात 26 जागांवर अंगणवाडी सेविकांची भरती

## खेड तालुक्यात अंगणवाडी सेविकांची 26 आणि मदतनीस महिला 35 रिक्त जागांची भरती प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे

**पुणे | प्रतिनिधी**

खेड तालुक्यातील खेड पंचायत समितीच्या महिला व बालविकास प्रकल्प कार्यालय खेड १ व २ मिळून खेड तालुक्यात अंगणवाडी सेविकांची २६ आणि मदतनीस महिला ३५ रिक्त जागांची भरती प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. दि.१८ फेब्रुवारीअखेर कार्यालयीन वेळेत स्थानिक महिलांनी विहित नमुन्यात अर्ज सादर करण्याचे आवाहन गटविकास अधिकारी विशाल शिंदे, बालविकास प्रकल्प अधिकारी अनिकेत पालकर व सारिका देशमुख यांनी केले आहे.

अंगणवाडी बालविकास प्रकल्प कार्यालय खेड क्रमांक १ मध्ये अंगणवाडी सेविकांची १३ तर मदतनीसांच्या २३ जागा रिक्त असल्याची माहिती बालविकास प्रकल्प अधिकारी सारिका देशमुख यांनी दिली. तर बालविकास प्रकल्प कार्यालय खेड क्रमांक २ मध्ये अंगणवाडी सेविका १३ आणि महिला मदतनीस १२ जागा रिक्त असल्याची माहिती प्रकल्प अधिकारी अनिकेत पालकर यांनी दिली.



### तर मदतनीस महिलांच्या रिक्त जागा पुढील प्रमाणे

» गुंडाळवाडी, सहाणेवाडी (कान्हेवाडी बु.),कारकुडी, जावळेवाडी (मंदोशी) , नायफड, धारेवाडी (खरोशी), वांजळे, भिवेगाव, एकलहरे, वडगाव पाटोळे,वाकी बु,रानमळा, कडलगवाडी, परसुल, वाजवणे, कुडे खू, घाटवस्ती (सांडभोर वाडी), चांडोली क्रं-१, कातकरीवस्ती (चांडोली), ठाकरवाडी (निमगाव), ठाकरवाडी (वाडा), सुरकुंडी आणि वाफगाव क्रं- १ अशा २३ रिक्त जागा भरण्यात येणार आहे. एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प खेड-२ मधील १३ अंगणवाडी सेविका आणि १२ मदतनीस रिक्त पदांची भरती प्रक्रिया सुरू करण्यात आली असून स्थानिक महिला उमेदवारांनी १८ फेब्रुवारीपर्यंत खेड पंचायत समितीच्या बालविकास प्रकल्प खेड २ मध्ये कार्यालयात सादर करावेत, अशी माहिती बालविकास प्रकल्प अधिकारी अनिकेत पालकर यांनी दिली.

महिला व बालविकास कार्यालय खेड क्रमांक १ मध्ये ठाकरवाडी (कान्हेवाडी बु.), बारापाटी (कमान), शिरोली, लादवड, ठाकरवाडी (वडगाव पाटोळे), सातकरस्थळ पुर्व, ढोरेभांबुरवाडी,जैदवाडी,गोसासी, सडकवस्ती (कनेरसर), तांबेवाडी (वरुडे), खरपुडी बु., ठाकरवाडी (जऊळुके खु.), या १३ जागा अंगणवाडी सेविकांच्या भरण्यात येणार आहे.

### अंगणवाडी सेविका पदे

» धामणे, कोरेगाव बु., सुपे, सावंजवाडी (आडगाव), कमलजाई (च-होली), बोरदरा, चिंचोशी, ठाकरवाडी (म्हाळुंगे ), बापदेवस्ती (कडाचीवाडी), कोळीये, कातकरवाडी (शिवे) आणि आंबेठाण अंगणवाडी नं-१, अशा एकूण १३ जागा भरण्यात येणार आहे. मदतनीस रिक्त जागा : आडगाव, भलवडी, विऱ्हाम, वाघु, तांबडेवाडी (वांद्रा) नाणेकरवाडी, विश्रांतवड (च-होली ), खराबवाडी नं-२, विठ्ठलनगर (सांगुर्डी) कोळीये, वाकी तर्फे वाडा, आंबेठाण- नं-२, अशा एकुण १२ रिक्त पदाच्या भरती होणार आहे.

### 18 फेब्रुवारी शेवटची तारीख...

» ग्रामपंचायत कार्यक्षेत्रातील पात्र महिला उमेदवाराकडुन अर्ज मागविण्यात येत आहे अंगणवाडी सेविका व मदतनीस या पदासाठी वयाची अट कमीत कमी २१ वर्षे जास्तीत जास्त ३५ वर्षे अशी राहील. अंगणवाडी सेविका या पदासाठी शैक्षणिक अहर्ता इ.१२ वी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. २ अपत्य मर्यादा, रिक्त पद भरतीसाठी विहीत नमुन्यातील अर्ज व अटी शर्ती संबधीत अंगणवाडी हद्दीतील ग्रामपंचायत कार्यालयात बुधवार, दि. ५ फेब्रुवारीपासून उपलब्ध करण्यात आले असून, उमेदवारांनी कागदपत्रासह भरलेले अर्जाचे प्रस्ताव मंगळवार दि. १८ फेब्रुवारीअखेर कार्यालयीन वेळेत खेड पंचायत समितीच्या महिला व बालविकास प्रकल्प कार्यालयात स्वीकारण्यात येणार असल्याची माहिती विस्तार अधिकारी अमित लोंढे आणि बापू बागंर यांनी दिली.

# झाडे वाचवण्यासाठी जमला हजारोंचा जनसमुदाय; बाणेर येथे हजारो नागरिकांनी मारल्या झाडाला मिठ्या..

## केंद्र सरकारच्या नदी सुधार योजनेअंतर्गत सुरु असलेल्या कामांना स्थानिक नागरिकांसह पर्यावरण प्रेमी नागरिकांनी व संघटनांनी तीव्र विरोध दर्शविला

**पुणे | प्रतिनिधी**

केंद्र सरकारच्या नदी सुधार योजनेअंतर्गत सुरू असलेल्या कामांना स्थानिक नागरिकांसह पर्यावरण प्रेमी नागरिकांनी व संघटनांनी झाडांना मिठ्या मारून तीव्र विरोध दर्शविला. बाणेर येथील कलमाडी हायस्कूल ते मुळा राम नदी संगमापर्यंत पर्यावरण प्रेमी नागरिकांनी रॅली काढून तेथील असलेल्या झाडांना मिठी मारून चिपको आंदोलन केले.



यावेळी प्रसिद्ध अभिनेते सयाजी शिंदे, लद्दाख मधील पर्यावरण प्रेमी सोनम वांगचुक उपस्थित होते. या आंदोलनात हजारो नागरिकांनी सर्व वयोगटातील नागरिकांनी सहभाग घेतला. प्रशासकीय यंत्रणेला वारंवार सांगूनही या ठिकाणी सुरू असलेले काम बंद होत नाही. यामुळे या चिपको आंदोलनाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी पंतप्रधानांना या विषयात गांभीर्याने लक्ष घालण्यासाठी हा प्रकल्प पर्यावरणाच्या दृष्टीने घातक असल्याने बंद करण्यात यावा अशा आशयाचे हजारो पत्र लेखन करण्यात आले.

शहरातील नदीची परिस्थिती बिकट होत आहे. नद्या ह्या देशाच्या रक्तवाहिन्या असून त्या दूषित झाल्या तर देश दूषित होईल. नद्यांचा विकास म्हणजे त्याचा कॅनल करणे गटार करणे नाही. त्यामुळे मुळा रामनदी संगम परिसरातील विकास कामांना आळा बसेल. राज्य शासनाने, पुणे महानगरपालिकेने यासंदर्भात जरूर विचार करावा आणि नदीला जिवंत ठेवावे. असे पर्यावरण प्रेमी अभिनेते सयाजी शिंदे म्हणाले.

आपल्याला जगण्यासाठी नदी वृक्ष यांची आवश्यकता असून ते वाचवण्यासाठी आपण सर्व एकत्र आलात याचा मला आनंद आहे अभिमान आहे आणि आपला आवाज लोकशाही मार्गाने राज्यकर्त्या पर्यंत पोहोचेल आणि ते यावर योग्य तो निर्णय घेतील अशी मला अपेक्षा आहे. श्वास आणि पाण्यापेक्षा कुठलीच गोष्ट महत्त्वाची नाही त्यामुळे पाणी आणि हवा वाचवण्यासाठी आज आम्ही एकत्र आलो आहोत. पर्यावरण वादी कार्यकर्ते सोनम वांगचुक म्हणाले.

सत्ताधारी भारतीय जनता पक्षाच्या नेत्यांनी व कार्यकर्त्यांनी मात्र या आंदोलनाकडे पाठ फिरवल्याचे दिसून आले. परिसरात मोठ्या प्रमाणात नागरिक जमून देखील त्यांच्या भावना ऐकण्यासाठी सत्ताधारी भारतीय जनता पक्षातर्फे मात्र कोणीही उपस्थिती लावली नाही.

### पर्यावरण विरोधी होत असलेल्या कामाचा निषेध

» उपस्थित नागरिकांनी झाडाला मिठ्या मारून फोटो काढून स्टेटस ठेऊन पर्यावरण जागृतीसाठी स्टेटसला ठेवण्यात आले. यावेळी शाळेतील मुलांनी पर्यावरण व नदी सुधारणेवर गाणे म्हणून जनजागृती केली. त्याचबरोबर अभिनेते सयाजी शिंदे यांनीही नदीवरील गाणी झुळझुळ नदीचे पाणी हे जनजागृतीसाठी म्हटले. नागरिकांमध्ये उत्साह वाढवण्याचं काम केले. यामध्ये नदीचे होत असलेले प्रदूषणाची व्यथा व गळचेपी या गाण्यातून मांडण्यात आली. विविध बॅनर व पोस्टर घेऊन या ठिकाणी पर्यावरण विरोधी होत असलेल्या कामाचा निषेध करण्यात आला.